महाराष्ट्र शासन

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र. तंशिप्र-१२२४/प्र.क्र. ०३/एम.आर्च /२०२४/२०६८ दिनांक :- २५/११/२०२४

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता एम.आर्च या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकरीता महत्वाची सूचना**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत एम.आर्च या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता एम.आर्च ही सामाईक प्रवेश परीक्षा राबविण्यात येत होती. तथापी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर नवी दिल्ली यांनी PGETA ही सामाईक प्रवेश परीक्षा घेणे सुरु केलेले आहे. त्यामुळे कमी उमेदवार संख्या असलेल्या एम.आर्च या अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्याची स्वतंत्र सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित न करता केंद्रिय स्तरावरुन कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या PGETA (POST GRADUATE ENTRANCE TEST IN ARCHITECTURE) या सामाईक प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश करण्याचे प्रस्तावित होते.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत एम.आर्च सीईटी २०२५ ही सामाईक प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात येणार नाही तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एम.आर्च या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता केंद्रिय स्तरावरुन कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणारी PGETA (POST GRADUATE ENTRANCE TEST IN ARCHITECTURE) ही सामाईक प्रवेश परीक्षा लागु राहील याची सर्व उमेदवार, पालक व संस्थांनी नोंद घ्यावी.

सही/-

**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**